# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/७९६

**अत्यंत महत्वाचे : कालमर्यादा दि. २१/०१/२०१७**

दिनांक : 18 JAN 2017

प्रति,
सर्व संबंधीत खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१५-१६ मधील ऑनलाईन ॲकॅडेमिक डिटेल्स अपडेट करणेबाबत
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती योजनेबाबत

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१६/२७०७, दि. ८/९/२०१६

संदर्भीय पत्रान्वये सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीचे अनुदान अदा करण्यापूर्वी संस्थांनी सर्व संबंधीत विद्यार्थ्यांचे एस.एस.सी. पासून ते शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पर्यंतचे सेमिस्टरवाईज ॲकॅडेमिक डिटेल्स ऑनलाईन भरण्याबाबत कळविले होते. तसेच ईबीसी २०१५-१६चे अनुदानाकरिता सदर परिपत्रकामध्ये ७ मुद्यांबाबतचे प्रमाणपत्र नमूद करण्यांत आले होते. ज्या संस्था या सर्व बाबींची पूर्तता करतील अशाच संस्थांना अनुदान अदा करण्यांत येईल याबाबत स्वयंस्पष्टपणे कळविले होते. तसेच वरील माहितीअभावी विद्यार्थी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीकरिता वंचित राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील असेही कळविण्यांत आले होते. तद्नंतर माहे नोव्हेंबर-२०१६ मध्ये सर्व संस्थांकतिरा दि. १७/११/२०१६ रोजी शैक्षणिक वर्ष २०१६-१७च्या ईबीसी ओरिएंटेशन प्रोग्रॅममध्ये याबाबतची सूचना मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांनी ओरिएंटेशन प्रोग्रॅमकरिता उपस्थित असलेल्या सर्व संस्थांना आवाहन केले होते की, सर्व संस्थांनी विद्यार्थ्यांचे ॲकॅडेमिक डिटेल्स तात्काळ अद्यावत करावेत. तसेच तद्नंतर या कार्यालयामार्फत वेळोवेळी दूरध्वनीवरुन तसेच गुणवत्ता याद्या तपासणी करण्याकरिता आलेल्या प्रतिनिधींना प्रत्यक्ष निरोपाद्वारे याबाबतचे गांभीर्य पटवून देऊनही शैक्षणिक वर्ष २०१५-१६चे ॲकॅडेमिक डिटेल्स सोबतच्या यादीतील संस्थांनी अद्यावत केलेले नाहीत. ही अत्यंत खेदाची बाब आहे.

**या परिपत्रकाद्वारे सोबतच्या यादीतील सर्व संबंधीत संस्थांना एक अंतिम संधी देण्यांत येत आहे की, त्यांनी कोणत्याही परिस्थितीत त्यांचे शैक्षणिक वर्ष २०१५-१६चे ॲकॅडेमिक डिटेल्स शनिवार, दि. २१/०१/२०१७ पर्यंत अद्यावत करावेत. सदर डिटेल्स अपडेट करतांना एस.एस.सी. पासून ते २०१५-१६ पर्यंत सेमिस्टरवाईज अपडेट करावेत. काही संस्थांनी इयरवाईज डिटेल्स अपडेट केलेले आहेत, तसे न करता सर्वांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी सेमिस्टरवाई डिटेल्स अपडेट करावेत.**

सदर ॲकॅडेमिक डिटेल्स अपडेट केल्यानंतर ज्यांनी अद्यापही शैक्षणिक वर्ष २०१५-१६करिता प्री ॲडव्हान्स रिसिट, एनईएफटी फॉर्म, हमीपत्र, ७ मुद्याचे प्रमाणपत्र, ॲकॅडेमिक ॲप्रुव्ह्ड लिस्ट, रिजेक्ट लिस्ट इ. दि. २३/०१/२०१७ रोजी सादर करावी. ज्या संस्था सदर प्रमाणपत्रे दि. २३/०१/२०१७ पर्यंत सादर करणार नाहीत. त्यांचे अनुदान शासनास परत करण्यांत येईल, व त्यामुळे जे विद्यार्थी ईबीसी प्रतिपूर्ती मिळण्यापासून वंचित राहतील त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांची राहील. याची सर्व संबंधीत संस्थेच्या प्राचार्यांनी गंभीर नोंद घ्यावी.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता

# Jt. Director, Technical Education, Regional Office, Mumbai

## List of Institutes whose not updated Academic Details of Student for A.Y. 2015-16

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Total Candidates Approved By Institute | Total Qualification Approved / Rejected By Institute | Total Candidates Approved By RO | Total Qualification Approved Rejected By RO |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3127 | NCRD's Sterling Institute of Management Studies, Navi Mumbai | 20 | 4 | 20 | 2 |
| 2 | 3131 | Hashmatrai and Gangaram Himathmal Mansukhani Institute of Management, Ulhasnagar, Thane | 1 | 0 | 0 | 0 |
| 3 | 3145 | Vivekanand Education Society's Polytechnic, Mumbai | 94 | 44 | 94 | 0 |
| 4 | 3169 | Late Bhausaheb Hiray S. S. Trust's Institute of Computer Application, Bandra (E), Mumbai | 7 | 7 | 7 | 0 |
| 5 | 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | 348 | 347 | 348 | 252 |
| 6 | 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | 198 | 196 | 198 | 158 |
| 7 | 3217 | Vighnaharata Trust's Shivajirao S. Jondhale College of Engineering & Technology, Shahapur, Asangaon, Dist Thane | 192 | 192 | 192 | 10 |
| 8 | 3222 | Haji Jamaluddin Thim Trust's Theem College of Engineering, At. Villege Betegaon, Boisar | 211 | 211 | 211 | 62 |
| 9 | 3223 | Mahatma Education Society's Pillai HOC College of Engineering & Technology, Tal. Khalapur. Dist. Raigad | 350 | 344 | 350 | 304 |
| 10 | 3224 | Leela Education Society, G.V. Acharya Institute of Engineering and Technology, Shelu, Karjat | 146 | 146 | 146 | 0 |
| 11 | 3255 | Mandar Education Society's Rajaram Shinde Institute of Engineering and Technology, Pedhambe | 46 | 46 | 46 | 10 |
| 12 | 3286 | Leela Education Society, G. V. Acharya Polytechnic,Shelu, Karjat | 52 | 52 | 52 | 0 |
| 13 | 3359 | SASMIRA's Institute of Management Studies & Research, Worli, Mumbai | 5 | 2 | 5 | 0 |
| 14 | 3421 | VIVA College of Diploma Engg &Tech., At. Bolinj, Virar (W) Dist. Thane | 32 | 32 | 32 | 2 |
| 15 | 3426 | Yadavrao Tasgaonkar Institute of Management Studies and Research, Village-Chadhai, Bhivpuri, Dist Raigad | 6 | 2 | 6 | 0 |
| 16 | 3438 | Aditya Institute of Management Studies & Research, Borivali | 1 | 1 | 1 | 0 |
| 17 | 3445 | Vishvatmak Jangli Maharaj Ashram Trust's Vishvatmak Om Gurudev College of Engineering, Mohili-Aghai, Shahpur. | 115 | 5 | 115 | 0 |
| 18 | 3467 | Vishwaniketan's Institute of Management Entrepreneurship and Engineering Technology(i MEET), Khalapur Dist Raigad | 188 | 100 | 188 | 1 |
| 19 | 3475 | A. P. Shah Institute of Technology, Thane | 41 | 34 | 41 | 0 |

I/C Joint Director
Technical Educational (ADM)
Regional Office, Mumbai

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com


परिपत्रक क्र. २/विकामुं/तंशि/२०१६/ 2707

दिनांक : 8 SEP 2016

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेच्या अंमलबजावणीबाबत.........................

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. टीईएम/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१-०३-२०१६
मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक
२. क्र. १५/अर्थसं/ईबीसी/प्रमाणपत्र/२०१६-१७/८८, दि. ०६/०९/२०१६
३. क्र. १५/तंशिसं/अर्थसं/ईबीसी ऑनलाईन फॉर्म भरणे/२०१६-१७/८२, दि. २९/०८/२०१६

वरील संदर्भांकीत विषयानुसार सर्व शासकीय, अनुदानीत तसेच विनाअनुदानीत संस्थांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजने अंतर्गत तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.ing या संकेत स्थळावर EBC Concession 2015-16 येथे संस्थांतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरुन सदर अर्ज विहीत कागदपत्रांसह संस्थेकडे जमा केलेले आहेत व अशा विद्यार्थ्यांचे अर्ज संस्थांस्तरावर मंजूर करुन ह्या कार्यालयाकडे जमा केले असतील अथवा जमा करावयाचे असतील अशा सर्व विद्यार्थ्यांच्या बाबतीत संदर्भीय क्र. २ मध्ये निर्देश केल्यानुसार संस्थांनी खालीलप्रमाणे प्रमाणपत्र त्यांच्या लेटरहेडवर नमूद करुन ह्या कार्यालयाकडे सादर करणे अनिवार्य आहे.

## संस्थेने सादर करावयाचे प्रमाणपत्र

**प्रमाणित करण्यांत येते की :-**

१. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व पालकांचे उत्पन्न रु. १ लाखापेक्षा कमी आहे.
२. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व शासनाच्या प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे झालेले आहेत.
३. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचे अधिवासी आहेत.
४. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थी फक्त ईबीसी या योजनेचा लाभ घेत असून दुसऱ्या कोणत्याही योजनेचा लाभार्थी नाही अथवा अर्ज सुध्दा केला नाही.
५. ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले असून त्यांच्या बँक खात्याशी लिंक केलेले आहे. तसेच पात्र विद्यार्थ्यांना ईबीसी रक्कम संस्थेकडून सदर खात्यात ईसीएसद्वारेच जमा करण्यांत येईल.
६. तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दि. ३१ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करुनच ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांची यादी तयार करण्यांत आलेली आहे.

...२.

७. तसेच ईबीसीसाठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीतील सर्व विद्यार्थ्यांचे एस.एस.सी. पासून ते आतापर्यंतचे सर्व निकालांचा तपशिल ऑनलाईन पोर्टलवर अद्यावत केलेला आहे.

वरील मुद्दा क्र. ७ अन्वये सर्व संस्थांना पुढे असेही कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ चे अनुदान प्राप्त होईपर्यंत ज्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज ह्या कार्यालयाकडे सादर केलेले आहेत. अशा सर्व विद्यार्थ्यांची एस.एस.सी. पासून ते आतापर्यंत त्या विद्यार्थ्यांने दिलेल्या सर्व परीक्षांचे निकालाचा तपशिल ऑनलाईन पोर्टलवर संस्थांनी वेळोवेळी अद्यावत करणे अनिवार्य आहे.

ऑनलाईन पडताळणीमध्ये ज्या विद्यार्थ्यांची वरील ७ मुद्यांबाबतची माहिती अपूर्ण असेल अशा विद्यार्थ्यांचे अनुदान संस्थांना अदा करण्यांत येणार नाही. याची संस्थांनी नोंद घ्यावी. वरील माहितीअभावी विद्यार्थी शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीकरिता वंचित राहील्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील.

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता